१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयांचे नूतनीकरण
(Redesigning of Existing Courts)
जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांचे नियंत्रणाखालील घाटंजी येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीस / नूतनीकरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः चौविआ २०१९/प्र.क्र.११९(८)/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ११ सप्टेंबर, २०१९.

वाचा-

१) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांकः चौविआ १२१६/प्र.क्र.१०७/१६/का.९, दि.१० नोव्हेंबर, २०१६.

२) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांकः चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.९, दि.१२ जून, २०१७.

३) प्रबंधक (निरीक्षणे-२) यांचे पत्र क्रमांक : बी (डब्ल्यु)६०४९ of २०१०/१३३१/१९२०४, दि. १५ जून, २०१९.

प्रस्तावना-

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या "न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण" (Strengthening the Justice Sector) या प्रयोजनासाठी सन २०१५-१६ ते २०१९-२० या ५ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्यासाठी रु.१०१४ कोटी इतका निधी नमूद केलेला आहे.१४ केंद्रीय वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयांचे नूतनीकरण या घटकासाठी ५ वर्षांच्या कालावधीकरीता रु.२२८ कोटी इतका निधी दर्शविलेला आहे. या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींची कार्यक्षम अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या कृती आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली असून संदर्भाधीन दिनांक १२ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाच्या सहमतीने १४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीच्या कामांना रुपये ५० लक्ष मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा

व सत्र न्यायालय, यवतमाळ यांचे नियंत्रणाखालील घाटंजी येथील न्यायालयाच्या नूतनीकरणाचे सन २०१८-१९ च्या दरसूचीवरील प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र.३ येथे नमूद पत्रान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाले आहेत. सदर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित सहायक कार्यकारी अभियंता यांनी तयार केले असून, संबंधित कार्यकारी अभियंता तसेच, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, यवतमाळ यांनी साक्षांकित केले आहे. त्या अनुषंगाने जिल्हा व सत्र न्यायालय यवतमाळ यांच्या नियंत्रणाखालील घाटंजी, जिल्हा यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतींच्या १४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत नूतनीकरणाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील न्यायालयांचे नूतनीकरण (Redesigning of Existing Courts) या कामांच्या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या; जिल्हा व सत्र न्यायालय यवतमाळ यांच्या नियंत्रणाखालील घाटंजी येथील न्यायालयीन इमारतीच्या नुतनीकरणासाठी रुपये ४९,९९,९२५/- (रुपये एकोणपन्नास लक्ष नव्व्याण्णव हजार नऊशे पंचवीस फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय माान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

न्यायालयीन इमारत घाटंजी, जिल्हा यवतमाळ

अ.क्र.	१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्रस्तावित कामे	कामांचा अंदाजित खर्च (रुपये)
1.	Establishing Vulnerable Witness Deposition Centres	३,१४,३९४
	Cost of Civil Works For Child Courts and Vulenrable Courts	५,२०,९१२
2.	Making Witness Box Adaptable to Wheel Chairs.	७६,१२३
3.	To make arrangment that the accused and vulnerable witness shall not come face to face at any point of time.	४५,९५४
4.	Construction of a closed cubical for accused having one way galss	१,८४,७४०
6.	Adaptation of toilets for Wheel Chair Users	४,५०,०००
7.	Braile symbol and Auditory Signals in Elevators and Toilets	१,१८,७७१
8.	Barrier Free Courts and Court Rooms for Person with disabilities.	६,६८,४१३
9.	Sanitation Facilities	३,५०,०००
10.	Plastering and Water Proofing	१०,२०,०००
11.	Anti Termite Treatment	१,५०,०००
	Electrification	२,००,०००

अ.क्र.	१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्रस्तावित कामे	कामांचा अंदाजित खर्च (रुपये)
	Total Cost of Works	**४०,९९,३०७**
	Add for 12% GST	४,९१,९१७
	Add for 0.50% Insurance	२०,४९७
	Add for 4% Municipal Council	१,६३,९७२
	Add for 1.5% Royalti and Testing Charges	६१,४९०
	Add for 3.97% Contingencies	१,६२,७४२
	एकूण **अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष नव्याण्णव हजार नऊशे पंचवीस फक्त**	**४९,९९,९२५**

२. जिल्हा व सत्र न्यायालय,यवतमाळ यांच्या नियंत्रणाखालील घाटंजी, जिल्हा यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतींच्या नूतनीकरणाचा खर्च "मागणी क्रमांक जे-१, २०१४ न्यायदान, (००) न्यायदान, १०२-उच्च न्यायालय, (११) कार्यरत न्यायालयांचे नविनीकरण, (११) (०१) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण (२०१४ ०५४८)" या लेखाशिर्षाखाली संबंधित आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी निश्चित केलेला कृती आराखडा व Dedicated Cell ने निश्चित केलेल्या कामांमधीलच उपरोक्त कामे असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांची राहील. प्रचलित कार्यपद्धतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रीया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

४. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३०८/१९/इमा-२, दिनांक १९.०७.२०१९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने तसेच शासन निर्णय, विधि व न्याय विभाग दिनांक १२.०६.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११८४३२३८५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagyashree Rajendra Bhaidkar

Digitally signed by Bhagyashree Rajendra Bhaidkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d567849462918ceb7579bb2b56247e927c039bbdf028022a8b9ce837a7c854bb, serialNumber=fb84fefefe4ee219c1bc35b35201c14eab0903e8194a7413a74eed93f32afdb0, cn=Bhagyashree Rajendra Bhaidkar
Date: 2019.09.11 18:54:03 +05'30'

(भाग्यश्री भाईडकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा,
४. प्रबंधक (निरीक्षणे-१) मा.उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
५. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, यवतमाळ.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता १ / २) , महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखापरीक्षा १ / २) , महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८. वित्त विभाग (व्यय-५) मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२) मंत्रालय, मुंबई.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.
११. उप कोषागार अधिकारी घाटंजी, जिल्हा यवतमाळ.
१२. विधि व न्याय विभाग (कार्यासन-९ / २३), मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (का.१२).